# ऋषितर्पण

## व्यक्तिदर्शन

प्रा. श. श्री. पुराणिक

◆ प्रकाशक
**छाया प्रकाशन**
३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव (दाभाडे) – ४१०५०६

◆ © **प्रा. श. श्री. पुराणिक**

◆ **अक्षरजुळणी व मुद्रक**
प्रतिमा ऑफसेट
१ बी, देवगिरी इस्टेट, सर्व्हे नं. १७/१ बी,
प्लॉट नं.१४, कोथरूड इंडस्ट्रियल एरिया,
कोथरूड, पुणे – ४११०३८.

◆ **प्रकाशन दिनांक :** ३/१०/२०१४

◆ किंमत : ६००/–

**चि. सौ. आसावरी, चि. सौ. अंजली,**

**चि. प्रणव, चि. ऋतुज,**

**चि. आदित्य आणि चि. सलिल**

**यांस...**

## प्रस्तावना

या ग्रंथाचे नाव ‘ऋषितर्पण’ असे आहे. ऋषींचे तर्पण करण्याचा संध्येमध्ये प्रघात आहे. ‘ऋषि’ शब्दाचा धात्वर्थ ‘ऋर्षिर्दर्शनात्’ असा आहे. म्हणजेच ज्याला दर्शन झाले आहे त्याला ऋषी असे म्हणतात. ज्याला तप:श्चर्येने सत्यस्वरूप परमेश्वराचे दर्शन झाले त्याला ‘ऋषी’ म्हणतात. त्याच न्यायाने संशोधनाच्या आणि अभ्यासाच्या बळावर ज्यांना इतिहासातील सत्याचे दर्शन झाले त्यांनाही ऋषी म्हणणे योग्य आहे. अशा ११ ऋषींची दर्शने घडविण्याचा या पुस्तकात प्रयत्न केलेला आहे.

‘व्यक्तिदर्शन’ असे या ग्रंथाचे उपशीर्षक आहे. ही नुसती चरित्रे नाहीत तर व्यक्ती म्हणून हे ऋषी कसे होते याचेही यथावत् रूपदर्शन घडविण्याचा यात प्रयत्न केलेला आहे. त्या दृष्टीने त्या व्यक्ती, त्यांचा स्वभाव, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे कौटुंबिक जीवन, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन, त्यांचे छंद आणि व्यसने, त्यांचे दैनंदिन जीवन याचेही या ग्रंथात वर्णन केलेले आहे.

राजवाडे यांचे स्वतंत्र चरित्रच मी लिहिलेले असल्यामुळे त्यांचा समावेश या पुस्तकात केलेला नाही. हा ग्रंथ लिहिताना ज्या ग्रंथकारांचा आणि ग्रंथांचा मला उपयोग झाला त्यांचा ऋणनिर्देश केलेला आहेच. त्याशिवाय य.न. केळकरांचे चिरंजीव श्री. वि. य. केळकर, शेजवलकरांचे पुतणे श्री. शशिकांत शेजवलकर आणि ग.ह. खरे यांचे पुतणे श्री. सुधीर खरे यांची मला फार मदत झाली. सुधीर खरे आणि शशिकांत शेजवलकर यांनी आपल्या काकांच्या आठवणी व वैयक्तिक जीवन याबद्दल माहिती दिली आणि शशिकांत शेजवलकर यांनी शेजवलकरांच्या ३० वर्षांच्या दैनंदिन्या उपलब्ध करून दिल्या. वि. य. केळकर यांनी तर प्रदीर्घ पत्र पाठवून केळकरांची वैयक्तिक माहिती कळविली. याबद्दल या सर्वांचा मी फार आभारी आहे.

हा ग्रंथ लिहिताना त्या थोर पुरुषांच्या सहवासात वावरत असल्याचा आनंद मला मिळाला. वाचकांनाही तो आनंद मिळाला तर मला समाधान वाटेल. या इतिहासकारांची छायाचित्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, यांचे मन:पूर्वक आभार.

या ग्रंथाची सर्व जबाबदारी चि. उमेश आणि चि. मृणाल यांनी घेतली. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

विजयादशमी — **श. श्री. पुराणिक**

०३.१०.२०१४

फ्लॅट क्र. २, ‘लोटस एन्क्लेव्ह’, ९८, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७. दूरध्वनी : ०२०-२५८९६१३८



## साभार ऋणनिर्देश

### वासुदेवशास्त्री खरे

१. वासुदेवशास्त्री खरे - दा. मो. भट
२. बहुरूपी - चिंतामणराव कोल्हटकर
३. वासुदेवशास्त्री खरे : स्मरणदिन भाषण - य. न. केळकर, १९५६
४. वासुदेवशास्त्री खरे यांचा मृत्यू - न. चिं. केळकर, केसरी अग्रलेख
५. मराठे आणि इंग्रज : प्रस्तावना - वासुदेवशास्त्री खरे

### द. ब. पारसनीस

१. वाङ्मयाचा वाफा - य. न. केळकर
२. लोकमान्य टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका - खंड १ - स. वि. बापट
३. इतिहास सप्तर्षी - अरविंद ताटके

### डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

१. पोर्तुगीज-मराठे संबंध - पांडुरंग पिसुर्लेकर
२. माधव गडकरी यांचे लेख आणि आठवणी - माधव गडकरी
३. महाराष्ट्र टाईम्समधील मृत्यूलेख - गोविंद तळवलकर

### द. वि. आपटे

१. दत्तोपंत आपटे लेख संग्रह
२. दत्तोपंत आपटे व्यक्तिदर्शन - त्र्यं. शं. शेजवलकर
३. लोकनायक अणे आणि त्यांचा काळ - वीणा हरदास

### सेतुमाधवराव पगडी- आनंदयात्री

१. जीवनसेतु - सेतुमाधवराव पगडी
२. आमचे दांपत्यजीवन - उषा पगडी, सोबत साप्ताहिक पुणे
३. पगडी यांच्या मुलाखती आणि लेख - माधव गडकरी व श्रीरंग कुलकर्णी

**दत्तो वामन पोतदार**

१. दत्तो वामन – शुभलक्ष्मी पोतदार
२. निवडक ठणठणपाळ – जयवंत दळवी
३. संकलन – श्री. बा. जोशी
४. दृष्टादृष्ट – य. दि. फडके
५. राजवाडे चरित्र – भा. वा. भट
६. उपेक्षेचे दिवस – अनिल जोशी, 'वृक्षवेली'

**जदुनाथ सरकार**

१. Jadunath Sarkar Commemoration Volume - H. R. Gupta
२. सरकार आणि सरदेसाई – श्री. रा. टिकेकर

**रियासतकर सरदेसाई**

१. सरकार आणि सरदेसाई – श्री. रा. टिकेकर
२. माझी संसारयात्रा – गो. स. सरदेसाई
३. सरदेसाईंची मुलाखत – आरोग्य मंदिर, १९५६
४. श्यामकांताची पत्रे – गो. स. सरदेसाई
५. आमच्या माई – 'स्त्री', एप्रिल १९४३– गो. स. सरदेसाई
६. रियासतींच्या प्रस्तावना

**शेजवलकर नावाचा झंझावात**

१. शेजवलकर स्मारक ग्रंथ – १९९५
२. एक सर्वमंगल क्षिप्रा – ह. वि. मोटे
३. आठवले ते – दुर्गा भागवत
४. दैनंदिन्या
५. मृत्युलेख – प्र. ल. सासवडकर
६. जगन्नाथाची चाळ – वि. ह. कुलकर्णी, ललित– सप्टेंबर १९८६
७. तसबीर आणि तकदीर – श्री. के. क्षीरसागर
८. मीनाक्षी एक भुईचक्र – शांता किर्लोस्कर
९. शेजवलकरांवरील लेख – गं. दे. खानोलकर
१०. श्री शिवछत्रपती – शेजवलकर



**ग. ह. खरे– एकमेवाद्वितीय**

१. माझे संशोधनाचे अनुभव – ग. ह. खरे
२. माझी इतिहाससंशोधनाची धडपड – ग. ह. खरे
३. सुधीर खरे यांच्या आठवणी
४. मूर्तीविज्ञान – ग. ह. खरे
५. महाराष्ट्राची ४ दैवते – ग. ह. खरे
६. अशी आमुची वाई

**य. न. केळकर– एक ऐतिहासिक पोवाडा**

१. ऐतिहासिक पोवाडे– य. न. केळकर
२. य. न. केळकरांची संभाषणे
३. वाङ्मयाचा वाफा

* * *